पुण्यनगरी
20 JAN 2023

# बहिणाबाई महोत्सव : विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव

जळगाव : बहिणाबाई महोत्सवास सोमवारी सुरवात झाली. याठिकाणी बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जिल्हाधिकारी अमन मित्तल यांनी उत्सवाचे उद्घाटन केले. तसेच आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षाचा शुभारंभ कृषी विभागातर्फे या महोत्सवात तृणधान्ये पूजन करून करण्यात आला. या महोत्सवात खान्देशातील विविध लोककला, शाहीरी पोवाडा, भारुड, वहीगायन आदी लोककलांबरोबरच शालेय व महाविद्यालयीन कलावंत पाच दिवस आपली कला सादर करणार आहेत.


(छायाचित्र – नितीन सोनवणे)

कार्यक्रमाच्या सुरुवातीला खेळ चारचौघींचा, रांगोळी स्पर्धा तसेच मेहंदी स्पर्धा झाली. जिल्हाधिकारी अमन मित्तल, विकास पाटील कृषी संचालक, डॉ. पी. आर. चौधरी, यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी विभागीय कृषी सहसंचालक मोहन वाघ, कृषी उपसंचालक अनिल भोकरे, उद्योगपती रजनीकांत कोठारी, अलीम थमस्ती, कुशल गांधी, बाळासाहेब सुर्यवंशी, किशोर ढाके, सपन झुनझुनवाला, बाळासाहेब सुर्यवंशी, डॉ. पी. आर. चौधरी, राजेश चौधरी, पंकज जैन, रमेश मुणोत अर्चना जाधव, शैला चौधरी, यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन विनोद ढगे यांनी तर दीपक परदेशी यांनी प्रास्ताविक केले. सामाजिक संस्था, व्यक्ती व युवा मंडळांना पुरस्कार विकास पाटील कृषी संचालक पुणे, तात्यासाहेब फडतरे पुणे, श्रीराम पाटील जळगाव, सुकन्या पाटील कुलकर्णी, राजेंद्र ठोंबरे चाळीसगाव, राहुल पाटील चोपडा, अजिंक्य क्रांती फाउंडेशन, जळगाव प्लॉगर्स, पशूपापा फाउंडेशन.